# ‘किल्ले संवर्धनासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत’

## खासदार डॉ. हेमंत सावरा यांची संसदेत मागणी

◆ विक्रमगड (वार्ताहर) :

सरकार पर्यटन वाढीसाठी लहान व मोठ्या पर्यटन स्थळांचा विकास करण्यावर भर देत आहे. विशेषतः इतिहासाची साक्ष देणाऱ्या किल्ल्यांचे संरक्षण व विकास करण्यासाठी प्रयत्नशील आहे.



अर्थसंकल्पीय अधिवेशनात संसदेत पालघर जिल्ह्यातील भारतीय पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत असलेल्या किल्ल्यांची दुरवस्था आणि नागरी सुविधांच्या अभावाबाबत प्रश्न उपस्थित केला. या ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी खासदार डॉ. हेमंत सावरा यांनी केली.

पालघर जिल्ह्यात वसई किल्ला, अर्नाळा किल्ला, शिरगाव किल्ला, अशेरी किल्ला, केळवा किल्ला, भोपतगड, कोहोज किल्ला, तांदुळवाडी, तारापूर, महालक्ष्मी, गंभीर गड, वज्रगड, डहाणू किल्ला, मांडवी किल्ला, काळदुर्ग आणि टकमक किल्ला यांसारखी अनेक ऐतिहासिक स्थळे किल्ले आहेत. ही स्थळे भूतकाळातील संस्कृती, कला आणि वास्तुशैलीचे प्रतिबिंब दर्शवतात; परंतु या किल्ल्यांच्या संरक्षणाची व विकासाची नितांत आवश्यकता आहे.

या किल्ल्यांवर पिण्याचे पाणी, शौचालय, कॅफेटेरिया आणि इतर नागरी सुविधा उपलब्ध होण्यासाठी योग्य उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. योग्य सुविधा निर्माण केल्यास पर्यटकांची संख्या वाढेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल, असेही सावरा यांनी नमूद केले.

# ‘परीक्षा कॉपीमुक्त, निकोप वातावरणात पार पाडाव्यात’

## पालकमंत्री गणेश नाईक यांचे पत्राद्वारे आवाहन

◆ पालघर (प्रतिनिधी) :

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत, शिक्षणमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता १२वी व इयत्ता १०वी च्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पाडाव्यात, असे आवाहन पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी पत्राद्वारे केले आहे.

तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षण हा सर्वात मोठा आधारस्तंभ आहे. आगामी परीक्षांच्या काळात तुम्ही निर्धास्त, आत्मविश्वासाने आणि प्रामाणिकपणे परीक्षेस सामोरे जावे, यासाठी जिल्हा प्रशासन आपल्यासोबत आहे. भयमुक्त कॉपीमुक्त परीक्षा या संकल्पनेला बळ देण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घ्यावा. शिक्षण हे केवळ गुणांसाठी नसून, ते तुमच्या ज्ञानवृद्धी आणि जीवन घडविण्याचे साधन आहे. समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी माझी सर्व विद्यार्थ्यांना विनंती आहे की, स्वतःच्या मेहनतीवर विश्वास ठेवा आणि प्रामाणिक प्रयत्नांमधून यश संपादन करा. विद्यार्थ्यांना सकारात्मक वातावरण मिळावे तसेच त्यांच्यात आत्मविश्वास वाढेल यासाठी पालक व शिक्षकांनी मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांची मानसिक तयारी करावी, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.



तसेच आगामी परीक्षा काळात कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रे भयमुक्त व कॉपीमुक्त राहतील यासाठी जिल्हा प्रशासन सर्वतोपरी कटिबद्ध आहे. परीक्षांच्या धर्तीवर राज्यामध्ये कॉपी प्रकरणास पूर्णतः प्रतिबंध करण्यासाठी व विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त आणि पारदर्शक परीक्षा प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासनाद्वारे विविध उपाययोजना करण्यात येत असून महाराष्ट्राची अस्मिता जोपासण्यासाठी आपण सर्वजण मिळून प्रामाणिकतेने आणि न्याय मार्गाने शिक्षणाला पुढे नेऊयात असेही त्यांनी या पत्रात म्हटले आहे.

# अंगणवाडी सेविका, मदतनीस पदभरतीला मान्यता

◆ विक्रमगड(प्रतिनिधी) :

महाराष्ट्र शासनाने अंगणवाडी सेविका व मदतनीस पदे भरण्यासाठी मान्यता दिली असून याबाबत शासन निर्णन जारी करण्यात आला आहे. त्या आनुषगाने विक्रमगड तालुक्यात अंगणवाडी ६ सेविका पदांसाठी आणि ७१ मदतनीस पदांसाठी रिक्त पदे उपलब्ध आहेत. तालुक्यात मंजूर सेविका पदे २९९ इतकी असून कार्यरत सेविका २९२ आहेत. त्यापैकी मलवाडा, देहर्जे उपराळे, आनंदपुर, कुंझे, वाकी २ या ठिकाणी



अंगणवाडी सेविकाच रिक्त पदे असून सुरूंमपाडा, जांभूळपाडा, पाटीलपाडा, कुवरपाडा, अंधेरी, खरपडपाडा, नालीपाडा, जनाठेपाडा, म्हसापाडा, चौधरीपाडा, दिवापाडा अशा एकूण ७१ मदतनीस भरती करण्यात येणार आहे. राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतणीस भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आल्या असून नवीन निकष लागू करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या बदलांमुळे भरती प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येणार असून उमेदवारांना त्यांच्या शेक्षणिक पात्रतेनुसार संधी दिली जाणार आहे.

# बोगस डॉक्टरांवर आरोग्य विभागाची कारवाई

◆ विरार (प्रतिनिधी) :

वसई-विरार पालिका कार्यक्षेत्रात तसा बोगस डॉक्टरांचा सुकाळ आहे. पूर्वेकडील बेकायदा चाळ आणि झोपडपट्टीच्या वस्तीत स्थायिक झालेले अनेक बाहेरून आलेले नागरिक व त्यामध्ये उपचार करणारे डॉक्टर यांनी जर नीट चौकशी केली तर त्यात बरेच डॉक्टर बोगस आढळतील. सुरुवातीच्या काळात महापालिकेच्या आरोग्य विभागाने शोध मोहीम राबवून अन्य राज्यातून बनावट डिग्री घेऊन आलेल्या तथाकथित डॉक्टरांची बोगसगिरी उघड केली होती. आता पुन्हा तसाच प्रकार उघडकीस आला आहे.

नालासोपारा, वसई आणि विरार या परिसरात बोगस वैद्यकीय व्यावसायिक प्रॅक्टिस करीत असल्याचे कळताच महापालिकेच्या आरोग्य विभागाने अशा दोन बोगस डॉक्टरांवर नुकतीच कारवाई केली.

महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य) व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत कार्यरत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात बोगस वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार केलेल्या कारवाईत हे दोन डॉक्टर बोगस असल्याचे दिसून आले आहे.

**मध्य रेल्वे**
मुंबई विभाग
निविदेची सूचना

मुंबई विभाग, मध्य रेल्वे हे ई-निविदा मॉड्यूलद्वारे **www.gem.gov.in** वर दोन वर्षांच्या (७३० दिवस) कालावधीकरीता अनुदानित जेवण आणि आणि इतर संबंधित कामाच्या तरतूदीसह छशिमट येथे टीटीई रेस्ट हाउसच्या सामान्य देखभाल आणि व्यवस्थापनाच्या आउटसोर्सिंगकरीता निविदा मागवित आहेत. **इच्छुक बोलीदारांनी बोली प्रक्रियेत भाग घेणे आवश्यक आहे आणि बोली उघडण्यापूर्वी सर्व आवश्यक दस्तावेज अपलोड करणे आवश्यक आहे.** अधिक तपशीलाकरीता इच्छुक बोलीदारांना तपशील जाणून घेण्यासाठी संकेतस्थळ **www.gem.gov.in** येथे भेट देण्याची विनंती करण्यात येत आहे. **खुली निविदा - जीईएम बोली क्रमांक - जीईएम/२०२५/ बी/ ५९१५३४५, कामाचे वर्णन** - दोन वर्षांच्या (७३० दिवस) कालावधीकरीता अनुदानित जेवण आणि आणि इतर संबंधित कामाच्या तरतूदीसह छशिमट येथे टीटीई रेस्ट हाउसची सामान्य देखभाल आणि व्यवस्थापन करणे. **कार्यालयाचा पत्ता** - डीआरएम कार्यालय, वाणिज्यिक शाखा, मुंबई विभाग, **कामाचे ठिकाण** - छशिमट स्टेशन, मुंबई विभाग, **जाहिरात केलेले मूल्य** - रु. १,२१,५८,२५८/-, **निविदेचा प्रकार** - दोन लिफाफा प्रणाली, **बोली पूर्व सभेची तारीख आणि वेळ** - दि. १२-०२-२०२५ रोजी १६:०० वा. सिनी. डीसीएम कार्यालय/ छशिमट येथे, **निविदा बंद होण्याची तारीख वेळ** - दि. २७.०२.२०२५ रोजी १२:०० वा. **कंत्राटाचा कालावधी** - दोन वर्ष (७३० दिवस), **प्रस्तावाची वैधता** - ६० दिवस, **निविदा दस्तावेज उपलब्ध असलेले संकेतस्थळ** - https://gem.gov.in/ विषयांकीत निविदेशी संबंधित पुढील पुरकपत्र / शुध्दिपत्र, निविदा मागे घेणे, तारीखेतील बदल, वेळ वाढविणे, स्पष्टिकरण आदी, काहीही असल्यास, ते केवळ संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. स्वतःला अपडेट ठेवण्यासाठी बोलीदारांनी नियमितपणे संकेतस्थळाला भेट द्यावी.

SUN 766 — सिनी. डीसीएम कार्यालय/ छशिमट

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

# मिरचीची आवक वाढल्याने दरात घट

◆ वाडा (वार्ताहर):

मिरचीचे उत्पादन वाढत असल्यामुळे आवक वाढली आहे. त्यामुळे बाजारात मिरचीचा भाव उतरण्यास सुरुवात झाली आहे. कोणत्याही प्रकारची मिरची केवळ १५० रुपये किलो दराने मिळत आहे. मिरचीचे भाव याहून खाली उतरण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. तेलंगणा राज्यात मिरचीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. मागील वर्षी याच सुमारास चांगल्या दर्जाच्या मिरचीचा भाव सुमारे २६० रुपये किलोपर्यंत पोहोचला होता. वाडा तालुक्यात



मिरची हा आहारातील अविभाज्य भाग बनला आहे. वाड्याच्या बाजारात प्रामुख्याने मालेवाडा, केसुरी, बुलेट, झिंगा, तेजा, आर मोर, शिव-५ या प्रकारच्या मिरचीला सर्वाधिक पसंती असते. सध्या सर्वच प्रकारची मिरची १५० रुपये किलो दराने विकली जात आहे. तेवढाच दर बाजारातही असल्याने नागरिक गावातच मिरचीची खरेदी करीत आहेत. मागील वर्षी मिरची पिकाला चांगला भाव मिळाला होता. त्यामुळे तेलंगणा राज्यातील शेतकरी मिरची पिकाकडे वळले. परिणामी मिरची पिकाचे उत्पादन वाढले आहे. बाजारात मिरची पिकाची आवक वाढल्याने भाव उतरले आहेत.

**उत्तर मध्य रेल्वे**
ई-निविदा सूचना

उप मुख्य विद्युत अभियंता, गती शक्ती, उत्तर मध्य रेल्वे, झाशी हे भारताच्या मा. राष्ट्रपतींकरीता आणि त्यांच्या वतीने खालील कामाकरीता ऑनलाईन (ई-निविदा) माध्यमातून मोहरबंद ''खुली निविदा'' मागवित आहेत.

| ई-निविदा क्र.:जेएचएस- जीएसयु-टीडी-२०२५-०४ | अंदाजित मूल्य (रु.) : ७४७२३९६.९१ |
|---|---|
| **कामाचे वर्णन : झाशी विभागाच्या सांक स्टेशन गुड्स शेड येथे अतिरीक्त गुड्स लाईनच्या तरतूदीकरीता २५ केव्ही ओएचई फेरबदल काम करणे.** | |
| इसारा रक्कम (रु.) : १४९५००.०० | निविदा बंद होण्याची तारीख: दि. ०५.०३.२०२५ |
| **स्वीकृती पत्र जारी केल्यापासून काम पूर्ण होण्याचा/ समाप्तीचा कालावधी : १२ महिने.** | |

निविदा दिनांक **०५.०३.२०२५ रोजी १५:०० वा.** पर्यंत ऑन लाईन सादर करता येतील. संपूर्ण तपशील आणि निविदा सादर करण्याकरीता कृपया भारतीय रेल्वे संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर पहा.
285/25 (AS)
North central railways | www.ncr.indianrailways.gov.in | @ CPRONCR

**उत्तर मध्य रेल्वे**
ई-निविदा सूचना क्र. : जेएचएस- एन- डब्ल्यू- ०९- २५ — दिनांक : ०६.०२.२०२५
ई-निविदा सूचना

वरीष्ठ विभागीय संकेत व दूरसंचार अभियंता, उत्तर मध्य रेल्वे, झाशी हे भारताच्या मा. राष्ट्रपतींकरिता आणि त्यांच्या वतीने खालील कामाकरीता ऑन लाईन (ई-टेन्डरींग) च्या माध्यमातून खुली निविदा मागवित आहेत.

**कामाचे वर्णन :** झाशी विभागामधील विविध स्टेशन्सवर सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची तरतूद करणे.

| कामाचे अंदाजित मूल्य : रु.१९०६३१६२.१० | इसारा रक्कम : रु. २४५३००/- |
|---|---|
| निविदा प्रपत्राचे मूल्य : निरंक | निविदा उघडण्याची तारीख : दि. २८.०२.२०२५, वेळ १५:०० वा. |
| **स्वीकृती पत्र जारी होण्याच्या वेळेपासून पुर्ण होण्याचा कालावधी : १२ महिने** | |

निविदा **दि. २८.०२.२०२५ रोजी १५.०० वा.** पर्यंत ऑन लाईन सादर करता येतील. अधिक तपशील आणि निविदा सादर करण्याकरीता कृपया भारतीय रेल्वेच्या संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर पहा. (उत्तर मध्य रेल्वे/ झाशी विभाग - सं. आणि दूर.)
270/25(DG)
North central railways | @CPRONCR | www.ncr.indianrailways.gov.in

# विराट नगरात नागरगोजे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन



**विरार :** भारतीय जनता पक्षाचे विरारचे माजी शहराध्यक्ष गोपीनाथ नागरगोजे यांच्या विराट नगर येथील भाजपा संपर्क कार्यालयाचे उद्घाटन नालासोपाऱ्याचे आमदार राजन नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, विरार शहराध्यक्ष रवी पुरोहित, गोपीनाथ नागरगोजे व शहरातील भाजपा कार्यकर्त्यांच्या मोठ्या गर्दीत करण्यात आले.

महानगरपालिकेच्या निवडणुका नजीकच्या काळात जाहीर होतील. गेल्या काही वर्षांनंतर महापालिकेच्या निवडणुका होणार आहेत. पुष्पापार्क, विराटनगर, यशवंत नगर, शीतल बाग या परिसरातील मतदारांचे प्रश्न सोडविण्यासाठी भाजपाच्या या संपर्क कार्यालयाचा उपयोग होणार असून आमदार राजन नाईक यांनी जनतेचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी आपली असून या भागातील जनतेने भाजपाला मोठे मतदान केले असल्याचे सांगितले.

यावेळी गोपीनाथ नागरगोजे यांनी विराट नगरात तो सखल भाग असल्याने पावसाचे पाणी साचते, लवकर निचरा होत नाही, त्यामुळे येथील जनजीवन विस्कळीत होते, लोकांना पावसाळ्यात घराबाहेर पडता येत नाही. तेव्हा हा सखल भाग पाण्याचा त्वरेने निचरा होण्याइतका योग्य करावा, यासाठी पालिकेकडे आमदारांनी शिफारस करावी, तसेच येथील नागरीकांचे इतरही प्रश्न जनता दरबार घेऊन सोडवावेत, अशी मागणी केली.

**उत्तर मध्य रेल्वे**
निविदा सूचना

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक/ कार्य/ झाशी** हे भारताच्या राष्ट्रपतीं करीता व त्यांच्या वतीने खालील कामांकरीता ऑनलाईन (ई-निविदा) माध्यमातून खुली निविदा मागवित आहेत.

**कामाचे वर्णन:** वीरांगणा लक्ष्मीबाई झाशी - वीरांगणा लक्ष्मीबाई झाशी रेल्वे स्टेशन येथे केवळ २४ महिन्यांकरीता सीवर लाईन, प्लॅटफॉर्म मॅनहोल, तपासणी चेंबर्सच्या साफसफाईच्या संदर्भात विविध दुरूस्तीच्या कामांची अंमलबजावणी करणे.

| ई-निविदा सूचना क्रमांक | अंदाजित मूल्य | इसारा रक्कम |
|---|---|---|
| झाशी- इंजि.- मुख्यालय- २०२५- २५ | रु. ५७१७२९०.२७ | रु. ११४००.०० |

**निविदा बंद होण्याची तारीख :** दि. २८.०२.२०२५ रोजी १५:०० वा. **स्वीकृती पत्र जारी होण्याच्या वेळेपासून कार्य समाप्ती/ कालावधीची तारीख :** २४ महिने. निविदा दिनांक **२८.०२.२०२५** रोजी १५:०० वाजेपर्यंत ऑनलाईन सादर करता येतील. संपूर्ण तपशील आणि निविदा सादर करण्याकरीता भारतीय रेल्वेच्या संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर पहा.
267/25 FA
North central railways | @CPRONCR | www.ncr.indianrailways.gov.in

**दक्षिण रेल्वे**
निविदा सूचना

वरिष्ठ विभागिय यांत्रिकी अभियंता, दक्षिण रेल्वे, सालेम – ६३६००५ ह्यांच्याद्वारे खालील कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत :

| अनु. क्र. | वर्णन | वर्णन |
|---|---|---|
| १. | निविदा सूचना क्रमांक आणि दिनांक | जीईएम/२०२५/बी/५९०८०२५ दि : ०६.०२.२०२५ |
| २. | कामाचे नाव | चार वर्षांच्या कालावधीसाठी सालेम स्थानक येथे (i) प्लॅटफॉर्म टर्न राऊंड गाड्यांच्या डब्यांची स्वच्छता आणि वॉटरिंग (ii) पीएफटीआर अटेन्शन दरम्यान एसी कोचेसमध्ये टॉयलेटरीजची तरतूद आणि (iii) पास थ्रू ट्रेन्सच्या कोचेसमध्ये वॉटरिंग. |
| ३. | अंदाजे मूल्य | रु. ७,९१,३३,१३९.३६ |
| ४. | निविदा समाप्ती दिनांक आणि वेळ | २८.०२.२०२५ १०.००:०० |
| ५. | निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळ | २८.०२.२०२५ १०:३०:०० |
| ६. | संकेतस्थळ | https://www.gem.gov.in |

निविदा जीईएम पोर्टल **https://www.gem.gov.in** वर **०६.०२.२०२५** रोजी कस्टम बीड म्हणून अपलोड करण्यात आली आहे.
जीईएम पोर्टलवर नोंदणीकृत असलेल्या संस्था केवळ सदर निविदेमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र असतील. वरील निविदेचा पूर्ण तपशिल जीईएम पोर्टल **www.gem.gov.in** वर देण्यात आला आहे. बोली सादरीकरणाच्या तपशिलासाठी कृपया संकेतस्थळ पोर्टल **www.gem.gov.in** चा संदर्भ घ्या. कामाचे स्वरूप, निविदेचे अंदाजे मूल्य ठिकाण आणि अन्य कागदपत्रांच्या तपशिलासाठी कृपया संकेतस्थळ पोर्टल **www.gem.gov.in** चा संदर्भ घ्या.

**ठिकाण: सालेम**
**दिनांक: ०६.०२.२०२५**
**वरिष्ठ विभागिय यांत्रिकी अभियंता, दक्षिण रेल्वे, सालेम, ६३६ ००५.**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना**
**ई निविदा सूचना क्रमांक ६८/२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक २५/०१/२०२५ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक प्रहार, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक मुंबई तरूणभारत, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | आझाद नगर, अंधेरी (प), मुंबई येथे म्हाडाच्या भूखंड क्रमांक १७, २० व पंतनगर, घाटकोपर (पू), मुंबई येथील इमारत क्र. २२३ च्या पुनर्विकासासाठी, विकासकाच्या नियुक्तीकरीता प्रस्ताव मागविणे. (तिसरी मागणी) | रु. ०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १४/०२/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.
ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल. त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.
सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
म्हाडा MHADA
**ई-निविदा सूचना क्र. १८७/२०२४-२५**

कार्यकारी अभियंता (पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१ (दूरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे जिल्हा उप निबंधक-३ (पश्चिम उपनगरे) यांचे कडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थाकडून **एकूण ४ कामांकरीता** बी-१ (percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर **https://mahatenders.gov.in** उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | १३/०२/२०२५ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | २७/०२/२०२५ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०३/०३/२०२५ सकाळी ०३:०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | ०४/०३/२०२५ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
**टिप : १.** विस्तृत ई-निविदा सूचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
**टिप : २.** निविदा सूचनेबाबत शुद्धिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

**म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**
Follow us:@mhadaofficial
CPRO/A/80
**सही/-**
**कार्यकारी अभियंता (प.), मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**

**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
निविदा सूचना

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे वर्णन | कामाची अंदाजित रक्कम रु. लाखात /बयाना रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | ३०००0५४७७२ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. ३ येथील शीतकरण यंत्रणेची ओव्हरहॉलिंग करणे. | १४.९६ / १८,४६५/- |
| २ | ३०००0५४८३९ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. ४ येथील ११० MVA रोहित्रांची पूर्ण तपासणी व आवश्यक दुरुस्ती करणे. | ४२.२० / ४५,७००/- |

**निविदा किंमत ११८०/–** प्रत्येकी निविदा ई–टेंडरींगच्या संकेतस्थळांवर प्रसिद्ध केल्याची तारीख **१२/०२/२०२५** निविदा विक्री कालावधी **दि. १२/०२/२०२५ ते २३/०२/२०२५, १७:00 वा. पर्यंत.** निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ **दि. २४/०२/२०२५ रोजी १७.00 वा. पर्यंत.** निविदा उघडण्याची तारीख व वेळ शक्यतो **दि. २४/०२/२०२५ रोजी १७:00 वा.**
**मुख्य अभियंता (को.ज.वि.कें.सं.पोफळी)**

**उज्जीवन स्मॉल फायनांस बँक**
नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना
उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जे आहे जेथे आहे तत्वावर" आणि "जे आहे जसे आहे" या दिवशी केला जाईल.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्र./ शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आयएनआर मध्ये / इरठे आयएन आरमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४४२०२१०१३००००००३५/ ४४२० – डोंबिवली | **१) चंद्रकांत किसन अबनावे, २) सुष्मा चंद्रकांत अबनावे**, दोघेही येथे राहणारः खोली क्र. ०२, श्री सदन अपार्टमेंट, तळ मजला, सिद्धिविनायक नगर, दिवा (पू), ठाणे ४००६१२. | ११.०८.२०२३/ ०८.०८.२०२३ अनुसार रु. १५,१८,३६२.६० | ०२.१२.२०२४ | रु. १९,८९,०००/- / रु. १,९८,९००/= |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** ठाणे महानगरपालिका हद्दीमधील गाव देतीवली, दिवा-देतीवली रोड, दिवा (पू), तालुका आणि जिल्हा ठाणे – ४०००६२ येथील एस. क्र. १४३, हिस्सा क्र. २ वर बांधण्यात आलेल्या "श्री सदन" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या तळ मजल्यावरील ५२० चौ. फू. (बिल्टअप मोजमाप) असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ००२ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| २ | ४४११२१०१८००००००५/ ४४११ – कोपरखैरणे | १) उत्तम बबनराव अम्ब्राले, २) **श्रीमती चबाबाई अम्ब्राले**, दोघेही राहणार सदनिका क्र. जी-३, तळ मजला, घर क्र. १३२, रेणुका निवास, रंजनदेवी मंदिराजवळ, सेक्टर – १९, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९ | २०.१२.२०२२/ १३.१२.२०२२ अनुसार रु. १६,७०,६५८.०२/- | २४.१२.२०२४ | रु. १८,०६,०००/- / रु. १,८०,६००/= |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** सदनिका क्र. जी-०३ (४२५ चौ. फू. क्षेत्रफळ), तळ मजला, घर क्र. ०१३२, मारेणुका निवास मालमत्ता क्र. केओपी-केओपी-०१३२, रेणुका निवास, रंजनदेवी मंदिराजवळ, सेक्टर – १९, कोपरखैरणे, नवी मुंबई. | | | |

**मालमत्ता (मत्तां) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ :: २१-०२-२०२५ आणि ०७-०३-२०२५ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान**
**बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक :: १९.०३.२०२५ रोजी स. ११:०० वा ते सायं. ५:०० वा. दरम्यान**
**लिलावाचा दिनांक आणि वेळ :: २०-०३-२०२५ रोजी स. ११:०० वा ते दु. २:०० वा. दरम्यान**

**इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत), बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाण:** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. बेला विस्टा, ओसवाल पार्क, पोखरण रोड क्र. २, ठाणे (प), महाराष्ट्र ४००६०६ अनु. क्र. १. २.
**(संपर्क व्यक्तीः कृष्णा सिंग – ७७६७८४७५८४, भक्ती नेना – ९२२४४७१४९४)**

**अटी आणि शर्ती :** ई- लिलाव "जे आहे जेथे आहे तत्वावर" आणि ''"जे आहे जसे आहे तत्वावर घेण्यात येणार आहे.
१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधीत्व नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०९). इच्छूक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com ला भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छूक खरेदीदार यांना ई लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९११९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.
५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा निर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. सदर प्रसिद्धी सूचना अमलबजावणी होणाऱ्या मुद्द्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते आहे की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे त्यांना लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेता येणे शक्य होईल.
ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

ठिकाणः मुंबई दिनांक : १०.०२.२०२५ — सही/- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

**पुणे महानगरपालिका**
भवन रचना विभाग
निविदा प्रक्रिया कक्ष
निविदा जाहिरात फेर निविदा कामे
२/१४३६ दि. ११/०२/२०२५

१) ई-निविदा विक्री कालावधी :- १२/०२/२०२५ दुपारी २.३० वा. वाजेनंतर ते १९/०२/२०२५ दुपारी दुपारी २.३० वा. वाजेपर्यंत..
२) निविदा स्वीकृती व अंतिम दिनांक व वेळ :- १२/०२/२०२५ दुपारी २.३० वा. वाजेनंतर ते १९/०२/२०२५ दुपारी दुपारी २.३० वा. वाजेपर्यंत..
३) तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडणे दिनांक :-२०/०२/२०२५ दुपारी ३.०० वा. वाजेनंतर

| अ. क्र | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा संच रुपये | निविदाविषयक जबाबदार व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पी.एम.सी/भवन/ २३०/२०२४-२५ | भवन रचना विभाग | पुणे शहरातील विविध नाट्यगृहामध्ये दुरुस्ती विषयक व इतर तदनुषंगिक कामे करणे. | ३३७७९९१ | ३३७८० | ३ महिने (पावसाळा कालावधीसह) | १३५९ | श्रीमती वर्षाराणी नारनवर ७४४७४७२४०२ |

टिप- जाहिरात क्र. ०२/ १२६४ दिनांक २०.०१.२०२५ रोजीच्या यापूर्वी मजकूर हा वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेला आहे.

(स्वाक्षरी-/)
**कार्यकारी अभियंता,**
भवन रचना कार्यालय
पुणे महानगरपालिका